**PRESS MONITOR**

Publication : Navarashtra
Edition : Mumbai
Date : February 19, 2017

# ‘स्वच्छ पाणी’ कॅम्पेन

मुंबई : मूनबो या एचएसआएल लि. या सॅनिटरीवेअर कंपनीच्या मुख्य ब्रॅण्डने त्यांच्या वॉटर प्युरिफायर्ससाठी ‘अब इंडिया पियेगा अच्छा’ या जाहिरात कॅम्पेनचा शुक्रवारी शुभारंभ केला. टीव्हीवर झळकणारी ही जाहिरात विविध सामाजिक-आर्थिक गटातील मुलांना एकत्र दाखवणारी एक कथा आहे. यात विविध गटातील मुले एकत्र खेळताना आणि पाणी पिताना दिसतात. कारण ‘अच्छा पाणी शेअर करना अच्छी आदत है’, हे स्लोगन घेऊन ही जाहिरात बनवली आहे.

## मूनबोचे वॉटर प्युरिफायर बाजारात



या कॅम्पेनबद्दल एचएसआयएलचे राकेश कौल म्हणाले की, स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होणे ही आजघडीला भारतातील एक मोठी समस्या आहे. भारतभरातील ग्राहकांना पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध करुन दिले जाणे, हे आमच्या ब्रॅण्डचे उद्दिष्ट आहे. या टीव्हीसीमधून आमचे उद्दिष्ट अगदी योग्य पद्धतीने समोर येत आहे. हृतिक रोशनसोबतची ओप्पो फोनची जाहिरात, आकाश डिजिटल, नेस्ले आणि ऊर्जा मंत्रालयाची जाहिरात करणाऱ्या अमन सचदेव यांनीच या जाहिरातीचे दिग्दर्शन केले आहे.